पुढारी

# रेल्वेत चोरी करणाऱ्या चोरट्याकडून
# दोन लाखांचा ऐवज जप्त

- पाच महिन्यांनंतर पोलिसांनी मुंबईतून ठोकल्या बेड्या
- महिलेचे दागिने असलेली पर्स चोरून झाला होता फरार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

रेल्वे प्रवासादरम्यान महिलेची पर्स चोरून फरार झालेल्या चोरट्याला लोहमार्ग पोलिसांच्या तपास पथकाने पाच महिन्यांनंतर कुलाबा मुंबई येथून बेड्या ठोकल्या आहेत. यावेळी त्याच्या ताब्यातून चोरी केलेला १ लाख ९९ हजारांचा किमती ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. रमेश लक्ष्मण होळकर असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी २४ वर्षीय महिलेने फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला या उस्मानाबादहून मुंबईकडे जाण्यासाठी बिदर सीएसएमटी मेल गाडीने पतीसोबत प्रवास करत होत्या. दरम्यान त्यांनी त्यांच्याकडील ऐवजाची पर्स डोक्याखाली ठेवली होती. परंतु लोणावळा स्टेशन येण्यापूर्वी त्यांना जेव्हा झोपेतून जाग आली तेव्हा डोक्याखाली पर्स नसल्याचे निदर्शनास आले. त्यांनी पर्सबाबत पतीकडे चौकशी केली तेव्हा त्यांनीदेखील पर्सबद्दल माहिती नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी बोगीत इतरत्र शोध घेतला असताना पर्स मिळून आली नाही. महिलेच्या पर्समध्ये सोन्याचे दागिने, मोबाईल असा तब्बल २ लाख ८ हजारांचा किमती ऐवज होता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना पोलिसांना तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे चोरटा कुलाबा मुंबई येथे वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने त्याच्या राहत्या घरी छापा टाकून त्याला अटक केली. त्याच्याकडे अधिक चौकशी करून अंगझडती घेतली असता त्याने चोरी केल्याचे कबूल केले. ही कामगिरी पोलिस अधीक्षक दीपक साकोरे, निरीक्षक सुरेशसिंग गौड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक एम. पी. जगझापे, कर्मचारी आळंदे, झगडे, पवार यांच्या पथकाने केली.

Pune Edition
13 Mar, 2020 Page No. 1

Scanned with CamScanner